भटकंती

अभिजित बेल्हेकर

ऋतुचक्राने श्रावणात प्रवेश केला, की सगळी दुनियाच नव्या नवलाईची होऊन जाते. हिरवाईने नटलेले डोंगर, त्यावरच्या धबधब्यांच्या शुभ्र माळा, ढगांचे मांडव; मधेच ऊन-पावसाचा खेळ या साऱ्यांनी ही सृष्टीच तरुण बनते. याच काळात निसर्गवेती दडलेली शिवालयेदेखील श्रावणाचे व्रत घेत घुमू लागतात आणि मग सचेतन, नितळ, ऊर्जेने भारलेला हा आसमंत आणखी सप्रद्ध भासू लागतो. गिरिकंदरी दडलेल्या एकान्त शिवालयांच्या भेटीचा हाच तो काळ. याचसाठी साताऱ्याजवळच्या यवतेश्वर कधीचा साद घालत आहे.

आपल्याकडे महादेवाची अनेक राऊळे ही डोंगरशिखरी अथवा गर्द झाडीत दडलेली आहेत. निसर्गात रमणाऱ्या या भोळ्या शंकराने सातारा परिसरातही अनेक गिरीवनी आपला मुक्काम थाटला आहे. साताऱ्याहून कासच्या दिशेने गेलेल्या डोंगरवाटेवरील असेच हे रम्य स्थळ यवतेश्वर!

साताऱ्याहून १० किलोमीटरवर हे यवतेश्वर गाव. सातारा ओलांडताच हा यवतेश्वरचा घाट लागतो. तो ओलांडला, की लगेचच हे झाडीत दडलेले यवतेश्वर गाव आणि मंदिर येते. यवतेश्वरच्या कमानीतून आत शिरले, की ही झाडीच सर्वप्रथम लक्ष वेधून घेते. असे म्हणतात, पूर्वी या भागात वेताची झाडे भरपूर होती. म्हणून या स्थळी असलेल्या महादेवाला वेतेश्वर असे नाव पडले. पुढे हळूहळू वाचेच यवतेश्वर झाले. एखाद्या स्थळाचा शोध घेताना तो त्याच्या नावापासून सुरू केला, की या अशा अनेक गमतीजमती उलगडत जातात आणि आपली शोधयात्रादेखील खोल आणि व्यापक होत जाते.

या निसर्गात रमतच आपण यवतेश्वर मंदिरापुढे येतो. अनेक जुन्या वृक्षांच्या पुढ्यात आपल्याला केवळ एक चिरेबंदी कमान दिसते. मंदिर असे दिसत नाही. उत्सुकतेने जेव्हा या पूर्व दिशेच्या कमानीत पोहोचतो, त्या वेळी यवतेश्वराचे ऐतिहासिक रूप प्रकट होते.

डोंगर उतारावरच साधारण दहा ते पंधरा फूट खोल एक काठळ खोदतात हे मंदिर थाटले आहे. यासाठी कमानीतून पायरी मार्ग उतरतो, की आपण मंदिरापुढे अवतरतो. एक मोठे खोदीव आवार. मधोमध मुख्य मंदिर, तर बाजूस काळभैरव आणि केदारेश्वराची अन्य दोन मंदिरे. हे खोदकाम आणि त्यावरचे मंदिर स्थापत्य यादव काळातील. नंतरच्या काळातही वेळोवेळी बदल घडलेले. कुठलेही खोदकाम आणि त्यावरचे निर्माण लगेचच काळाची अशी पुटे चढवू लागते. पहिल्यांदा उत्सुकतेपोटी आपण हे बाह्य आवारच फिरू लागतो. काळभैरव, केदारेश्वर ही शंकराचीच व्यक्त आणि अव्यक्त रूपे. या प्रत्येकाचे प्रयोजन निराळे. यातील काळभैरवाची मूर्ती पाहण्यासारखी. त्यांच्या दर्शनासोबतच वीर मारुती, गणपती यांच्याही घुमट्या दिसतात. उंच दीपमाळ, वीरगळ आणि अशीच काही ऐतिहासिक शिल्पेही दर्शन देतात.

हे सारे पाहिल्यावर मुख्य मंदिरात शिरायचे. नंदीमंडप, सभामंडप, अंतराळ, गर्भगृह आणि शिखर अशी यवतेश्वर मंदिराची रचना. यातील नंदीमंडपात येताच यवतेश्वराचे विशेषण जाणवते. इथे शेजारी शेजारी विराजमान दोन नंदी दिसतात. महादेवाच्या दारी असे जुळे नंदी पाहून आश्चर्य वाटते. त्यांची शैली, आकार भिन्न. कदाचित वेगवेगळ्या कालखंडात, शैलीत घडवलेले किंवा शेजारच्या केदारेश्वरपुढचा नंदीदेखील या मंडपात स्थानापन्न झालेला. काहीही असले, तरी हे शांत

बसलेले जुळे नंदी खूप वेगळे वाटतात. मंदिराचा सभामंडप काही स्तंभांवर आधारलेला. यानंतरचा अंतराळ अन्य मंदिरांच्या तुलनेत प्रशस्त. याचे छत गजपृष्ठाकृती. गाभाऱ्याचे प्रवेशद्वार सालंकृत. विविध भौमितिक आकारांनी सजवलेले. आत प्रवेश करताना पुन्हा काही पायऱ्या खाली उतराये तेव्हा महादेव दर्शन देतात.

यवतेश्वराच्या प्राकारात शिरताना खोलीकडे घेऊन जाणारा हा प्रवास इथे अगदी गर्भगृहापर्यंत सुरू असतो. गर्भगृहाची ही खोली आणि डोईवर उंच गेलेले छत, या दोन्हींचे त्या स्वर्ग - पाताळशी नाते. तिन्ही लोकींचा तो देव ना!

समोरचे स्वयंभू शिवलिंग चार रानफुलांनी सचेतन झालेले असते. या खोली एकान्त देखाव्यात बाजूच्या भिंतीलील दोन झरोके त्या शिवलिंगावर किरणांचा अभिषेक घालत असतात. या अशा भावास्थेत त्या शंकराशी जडणारे नाते हे अनुभूतीचे; त्याच्या आणि आपल्या शोधाचेच असते!

पूर्व दिशेप्रमाणेच या प्राकाराला पश्चिमेलाही एक प्रवेशद्वार. हा मार्ग मंदिरामागेच खोदलेल्या एका मोठ्या चौरस जलवास्तूवर घेऊन येतो. देवतळे असे याचे नाव. याचे पाण्याशी असलेले नाते अद्याप जिवंत. या तलावाच्या तळाशी पाणी जमा करणारे मार्ग आहेत तसेच पाणी वाहून जाण्यासाठीही काही मार्ग ठेवलेले दिसतात. उन्हाळ्यात पाणी खोल गेले, की या रचना दिसतात. हे सारेच पाहण्यासारखे आहे.

पावसाळ्यात हा सगळा तलाव पाण्याने भरून जातो. अगदी त्याच्या बांधकामावरही शेवाळाची हिरवी मखमल पसरते. त्या हिरवाईवर तेरडा, सोनकी अशी रानफुले आपल्या रंगांची नक्षी पेरतात. यातच मग श्रावणातील कोवळे ऊन पसरले, की हा सगळा देखावा चित्रासारखा उदून दिसू लागतो.

यवतेश्वराभोवतीची झाडी खरे तर मूळची एक देवराई. आंबा, बेहडा, जांभूळ, वड असे अनेक वृक्ष. यातीलच एका आंब्याच्या झाडाला ऐन कार्तिक महिन्यात मोहोर येतो. श्रद्धाळू मने समजतात देवाचाच स्पर्श हा. मग यातूनच आश्विन महिन्याच्या अमावास्येला या आंब्याच्या झाडापासून देवाची पालखी निघते. पालखीत या आंब्याच्या मोहराची एक फांदी ठेवली जाते आणि यवतेश्वराचे रूप समजत मंदिरापर्यंत तिची मिरवणूक निघते. निसर्ग आणि देवाचे किती अतूट हे नाते! बजबजपुरीत अडकलेल्या शहरी तीर्थस्थळांच्या पुढ्यात या अशा जागा किती नितळ वाटतात ना!

खरे तर मंदिर ही अशाच साऱ्या भवतालाची मिठून बनलेली एक परिसंस्था. मग मंदिराचे जतन करताना त्याच्या या भवतालाचेही भान हवेच ना? झाडीत दडलेल्या यवतेश्वराच्या गाभाऱ्यातील घंटेचे नाद असेच काहीसे सांगत होते!

■ abhijit.belhekar
@expressindia.com

विद्यापीठाला पूर्णवेळ कुलसचिवपदाची प्रतीक्षा

लोकसत्ता प्रतिनिधी

चार वर्षांपासून प्रभारींवरच कामकाज

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलसचिवपदाच्या अन्य एक पद भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. कायमस्वरूपी पद भरण्यासाठीची ही जाहिरात आहे.

- डॉ. प्रशांत अमृतकर,
प्र-कुलसचिव

> डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलसचिवपदाच्या अन्य एक पद भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. कायमस्वरूपी पद भरण्यासाठीची ही जाहिरात आहे.
> **- डॉ. प्रशांत अमृतकर,**
> प्र-कुलसचिव

पाहिलेले आहे. त्यानंतरपासून पूर्णवेळ कुलसचिव विद्यापीठाला मिळालेले नाहीत. डॉ. जयश्री सूर्यवंशी यांच्यानंतर रसायन तंत्रशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. भगवान साखळे यांच्याकडे कुलसचिवपदाचा प्रभार देण्यात आला होता. डॉ. साखळे यांच्यानंतर जानेवारी २०२४ पासून डॉ. प्रशांत अमृतकर यांच्याकडे प्रभार सोपवला आहे. डॉ. अमृतकर हे राज्यशास्त्र विभागात कार्यरत होते. राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. मोईन शाकीर हे गतवर्षीच निवृत्त झाले असून, कुलसचिव म्हणून प्रशासकीय कामकाज करत असलेले डॉ. प्रशांत अमृतकर यांच्याकडे राज्यशास्त्र विभागाचेही काम असल्याचे सांगण्यात येत आहे. कुलसचिवपद हे पूर्णवेळचे पद असतानाही या पदावर 'पात्र' व्यक्ती मिळत नसून, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, अधिसभा, अभ्यास मंडळ, कार्यकारी मंडळाच्या बैठकांचे नियोजन त्यांच्याकडे येते. विद्यापीठ कायद्यांची, नियमांची, पत्रव्यवहार, विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियंत्रण व व्यवस्थापन आदी कामकाज कुलसचिवांकडे येते. नव्याने काढण्यात आलेल्या जाहिरातीनुसार, १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर या कालावधीत कुलसचिवपदासाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. २३ सप्टेंबरपर्यंत अर्जांची मुख्य प्रत विद्यापीठ प्रशासनाच्या आस्थापना विभागात सादर करावयाची आहे.

हिंगोलीतील शेतकऱ्यांचा 'शक्तिपीठ'विरोधात संताप

झिरवाळांना घेराव, राजू शेट्टींचा घणाघात

हिंगोली : प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाचा विरोध निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून, हिंगोलीत पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांचा संताप उफाळून आला होता. 'शक्तिपीठासाठी जमीन देणार नाही'च्या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला. पोलिसांनी पालकमंत्र्यांना संरक्षण देत बैठकीतून बाहेर काढल्यानंतर त्यांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या कक्षात आसरा घेतला.

आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीदरम्यान शेतकऱ्यांनी अचानक प्रवेश करून शक्तीपीठ महामार्गाबाबत पालकमंत्र्यांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी केली. १ मे रोजी स्वतंत्र बैठक घेण्याचे आश्वासन देऊनही अद्याप बैठक न झाल्याने शेतकऱ्यांचा रोष वाढला होता. गदारोळामुळे काही काळ तणावाचा वातावरण निर्माण झाले. याच पार्श्वभूमीवर रविवारी वसमत तालुक्यातील हट्टा येथे शक्तिपीठ महामार्गविरोधी संघर्ष समितीच्या एल्गार परिषदेत माजी खासदार राजू शेट्टी यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. 'शक्तिपीठचा नव्हे, तर शेतकऱ्यांच्या मरणाचा हायवे आहे. आमच्या सुपीक जमिनी आणि घरांवरून महामार्ग न्यायचा असेल, तर आधी आमच्या छातीवरून जावे लागेल,' असा घणाघात केला.

नांदेड जिल्ह्यात सरासरी पावसात घट

नांदेड : आश्लेषा नक्षत्राच्या १५ दिवसांत जिल्ह्यात्यामध्ये अपेक्षेप्रमाणे पाऊस झाला नाही. त्यानंतरही पावसाने ओढ दिल्यामुळे सरासरीमध्ये बरीच घट झाल्याचे दिसून येते.

यंदाचा पावसाळा सुरू झाल्यांनतर जुलैअखेर पडलेल्या पावसाने पहिल्या दोन महिन्यांतील सरासरी ओलांडलेली होती. जुलैच्या शेवटच्या चार दिवसांत पावसाने कहर केला होता. आसपासच्या जिल्ह्यांतही जोरदार पाऊस झाल्यामुळे विष्णुपुरी प्रकल्प भरला; पण त्यानंतर नांदेड तालुक्यासह अन्य भागांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली नाही. १ जून ते १८ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यात पडणाऱ्या पावसाची सरासरी ५३ मिलीमीटर असते; पण यंदा आतापर्यंत झालेल्या पावसाची सरासरी ४७८ मि.मी. असल्यामुळे आता चिंता व्यक्त होऊ लागली आहे. गतवर्षी ऑगस्टच्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यादरम्यान जोरदार पावसाची नोंद झाली होती. शेतकऱ्यांच्या दृष्टीने 'मघा' नक्षत्र महत्त्वाचे असते. या नक्षत्रामध्ये मुसळधार वृष्टी अपेक्षित असली, तरी पहिले दोन दिवस कोरडेच गेले. मागील पंधरवड्यात अगदी जेमतेम पाऊस झाल्यामुळे १ ऑगस्ट रोजी नोंदविल्या गेलेल्या सरासरीत घट झाली आहे. आतापर्यंतच्या पावसाची सरासरी ८८ टक्के असले, तरी वार्षिक सरासरीच्या तुलनेत झालेला पाऊस ५३ टक्के असल्याचे दिसून येते.

बँक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda
शाखा : बीड मुख्य
पत्ता: डिपी रोड,सह्योगनगर, बीड, महाराष्ट्र ४३११२२

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

"परिशिष्ट-IV-A नियम [६ (२) आणि ८ (६) ची तरतूद पहा]"

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ६(२) आणि ८(६) च्या तरतुदीच्या वाचण्यानुसार स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार, तारणदार आणि जामीनदार यांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, बँक ऑफ बडोदा या सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष ताब्यात घेतलेली खालील वर्णित स्थावर मालमत्ता, जी सुरक्षित धनकोकडे गहाण/प्रभारीत आहे, ती खाली नमूद केलेल्या खात्यातील थकबाकीच्या वसूलीसाठी **जसे आहे जेथे आहे** (As is where is), **जसे आहे जसे काही आहे** (As is what is), **आणि जे काही आहे ते** (Whatever there is) या तत्त्वावर विकली जाईल.

कर्जदार/तारणदार/हमीदार/सुरक्षित मालमत्ता/धारकाची/राखीव किंमत/ई-लिलाव तारीख व वेळ, इसारा जमाचा रक्कम (EMD) आणि बोली वाढीच रक्कम यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

कर्जदार/संचालकांचे नाव व पत्ता	**श्री. महेश रत्नाकर बेदरे** पत्ता: फ्लॅट क्र. ४ (जुना), माऊली अपार्टमेंट, बीड नगरपालिका घर क्र. १-४-५४३३, सर्व्हे क्र. ३०/अ, माऊली अपार्टमेंट, काशिनाथ नगर, पांगरी रोड, ता. जि. बीड-४३११२२.
हमीदाराचे/जामीनदाराचे नाव व पत्ता	**श्री. उद्धवंत विलास उद्धवराव** पत्ता: मु. पो. तुळजाई नगर, बालेपीर, नगर रोड, बीड, तालुका जिल्हा बीड-४३११२२.
ज्ञात बोजांसह (असल्यास) स्थावर मालमत्तेचे तपशीलवार वर्णन	**श्री. महेश रत्नाकर बेदरे यांच्या नावावर असलेला निवासी फ्लॅट क्र. ४ (जुना), माऊली अपार्टमेंट, बॉर्ड क्र. १, गट क्र. ४, बीड नगरपालिका घर क्र. १-४-५४३३, सर्व्हे क्र. ३०/अ, माऊली अपार्टमेंट, काशिनाथ नगर, पांगरी रोड, ता. जि. बीड-४३११२२.** **क्षेत्रफळ: बिल्ट-अप क्षेत्र ६३.३८ चौ. मीटर, कार्पेट क्षेत्र ४८.८८ चौ. मीटर.** **फ्लॅट क्र. ४ चा चतु:सीमा:** **उत्तर:** जिना आणि पॅसेज (Staircase Passage) **दक्षिण :** दामू गिराम यांचा फ्लॅट **पूर्व:** केशव गिराम यांनी विकलेली जमीन **पश्चिम:** फ्लॅट क्र. ७३ **माऊली अपार्टमेंटच्या चतु:सीमा:** **उत्तर:** फ्लॅट क्र. १५ **दक्षिण :** रोड **पूर्व:** केशव गिराम यांनी विकलेली जमीन **पश्चिम:** २० फूट रस्ता
ताब्याची स्थिती (सांकेतिक/प्रत्यक्ष)	प्रत्यक्ष(PHYSICAL)
आजच्या तारखेपर्यंतची एकूण थकबाकी	रु. १०,४७,२७४.५१/-
राखीव किंमत (Reserve Price)	रु. ९४,८३,०९२/-
ई-लिलावाची तारीख	दिनांक १८/०९/२०२६
लिलाव सुरू आणि समाप्तीची वेळ	सुरुवात वेळ: दुपारी ०२:०० वा. समाप्ती वेळ: संध्याकाळी ०५:०० वा.
इसारा अनामत रक्कम (EMD)	रु. ९,४८,३१०/-
बोली वाढीच रक्कम (Bid Increase Amount)	रु. १०,०००/-
मालमत्ता तपासणीची तारीख व वेळ	दिनांक १५-०९-२०२६, वेळ: सकाळी ११:३० वा.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction.htm आणि ऑनलाइन लिलाव पोर्टल https://baanknet.com या संकेतस्थळाला भेट द्या. तसेच, इच्छुक बोलीदार **अधिकृत अधिकाऱ्यांशी दूरध्वनी क्र. ९४२१८७६५२१, मोबाईल क्र. ८१८००३८२१४ या संपर्क साधू शकतात.**

स्वाक्षरी/-
दिनांक : १२/०८/२०२६ अनुराग,
ठिकाण : बीड अधिकृत अधिकारी,
(टिप : स्वेर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य) बँक ऑफ बडोदा

एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड
माहिती सूचना

खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि सह-कर्जदारांना सूचित केले जाते की, त्यांनी त्यांच्या जंगम मालमत्तेला गहाण ठेवलेल्या मालमत्तेतून (खालील तपशील तसात नमूद केलेले) काढून घ्यावे. जो **एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (एक शेड्यूल्ड कमर्शियल बँक)** योच्याद्वारे सरफेसी कायदा २००२ अंतर्गत लिलाव प्रक्रियेद्वारे विकली जाणार आहे, अन्यथा जंगम मालमत्ता त्यांच्या स्वतःच्या सर्वांनी बोलणाऱ्या मालमत्ता टिकाणी हलवाली हलवाविले केली जाईल आणि जर ती १५ दिवसांच्या आत काढून टाकली गेली नाही तर ते हस्तांतरणादरम्यान झालेल्या बोलण्याही नुकसानीसाठी देखील जबाबदार असतील. इतर प्रश्नांसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा. **विशाल झाकडे ८५०५०४४९०७** किंवा जवळच्या शाखेशी संपर्क साधा.

कर्ज खाते क्र./ कर्जदार/सह-कर्जदार/ गहाण ठेवणारे/ जामीनदाराचे नाव	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे तपशील
(कर्ज खाते क्र.) एल९००१९६०१४०१९४५६, मेसर्स नॅशनल फार्मा, त्यांच्या प्रोप्रायटरमार्फत, अंतराळ अहमद बागवान (कर्जदार),	मालमत्ता येथे स्थित- प्लॉट क्र.- १६६, एमसीएच क्र. ९/४९६०, अ. क्र.- ५/११ पा अंतराळ अहमद हबीब बागवान, हबीब बागवान यांचा मुलगा (सह-कर्जदार), मधे, नवीन ४/३, मीठ - उदगीर, श्रीमती फरीन अंतराळअहमद बागवान, अब्दुलाजाक शेख यांची मुलगी (सह-कर्जदार)
दिनांक: १८.०८.२०२६ **ठिकाण: लातूर, महाराष्ट्र**	**अधिकृत अधिकारी** **एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**

टायगर होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड
TYGER HOME FINANCE
नोंदणीकृत कार्यालय : गुलिट नं. ४०१ व ४०२, ६वा मजला, मॅनेस्टिक, लॅ गार्डनजवळ, पंचवटी रोड, एहिसरबीज, अहमदाबाद, गुजरात - ३८० ००६. **कॉर्पोरेट कार्यालय :** जय बीकेसी, सी-विंग, १००६५, ९०वी मजला, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई-४०० ०५१, महाराष्ट्र, भारत.
CIN : U65999GJ2017PTC098960, वेबसाइट : www.tygerhomefinance.in

सरफेसी ॲक्ट, २००२ च्या सेक्शन १३(८ र २) अंतर्गत मागणी सूचना

तुम्ही याखाली नमूद केलेले ऋणको, सह-ऋणको / हमीदारांनी **टायगर होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडकडून** (पुढील सेससे अदानी हाउसिंग फायनान्स ह्र. लि. म्हणून ज्ञात असलेली, दिनांकित ०६ जून, २०१४ सॉलिसिटर आणि इन्फोर्सिमेंटच्या, कंपन्या निबंधक, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या कार्यालयाद्वारा निर्गमित केलेले, याद्वारे **"टीएचएफएल"** म्हणून संदर्भित) तुमची स्थावर मालमत्ता (सुरक्षा) गहाण ठेवून कर्ज सुविधेचा लाभ घेतला होता.

परिणामी, तुम्ही कराचुकीचे तुम्हाला कर्जाचे नॉन-पर्फार्मिंग ॲसेट्स म्हणून घोषीकरण करण्यात आले होते. पहिल्या ऐतीमध्ये याचुकीकरिता **टायगर होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडने** सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ("ॲक्ट") च्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना निर्गमित केली आहे, त्यातील समाविष्ट मजकूर सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ३(१) यासह वाचलेल्या सेक्शन १३(२) नुसार यामध्ये प्रविष्ट करण्यात येत आहे.

अनु क्र.	लोन अक्ष. व. / ऋणको / सह-ऋणको / हमीदाराचे नाव	गहाणघट मालमत्तेचा पत्ता	मागणी सूचना तारीख / थकित रक्कम / थकबाकी तारीख
१	**805111L00115638४ / केशव पांडुरंग यादव / झाकबाई पांडुरंग यादव**	तुमेरे मालमत्तेने सर्व खंड व तुकडे - निळकंठ नं. ८५, मोजमापाचे १०८९ चौ.फू. (१०१.२० चौ.मी.) अब्दुलाणू. ता. गंगापूर, जि. औरंगाबाद, जी पुढीलप्रमाणे मिसित आहे : पूर्व : राजू अक्षयाबोध कानडे, पश्चिम : सार्वजिक निकाचे कानडे, उत्तर : सखाहरी अक्षयाबोध कानडे, दक्षिण : पुणाजी नाना कानडे.	१०-जॉनवर-२६ / रु. २१७४४३/- १०-जॉनवर-२६ सेक्शनमाणे

तुम्ही ऋणको तसेच सह-ऋणको / हमीदारांनी त्यानुसारे या सूचनेच्या १० दिवसांच्या आत पूर्णतः वाद नर नमूद केलेल्यानुसार पूर्वोक्त त्यासहात वर नमूद केलेल्या व मागणी केलेल्या रकमेचे प्रदान करण्यात फसविण्यात आले आहे, त्यात असमर्थ ठरल्यास निम्नलाक्षीकारात वर नमूद केलेल्या सुरक्षेवर अंमलबजावणी करण्यास कारवाई करणे योग पडेल. तुम्ये अधिनियम सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे लक्ष वेधीत आहोत, त्याप्रमाणे तुमहास पूर्वोक्त तरतुदीमधे निर्विष्ट कालावधीच्या आत सुरक्षित मालेचे विमोचन करण्यास स्वतंत्र आहे. कृपया नोंद घ्यावी की, उक्त अधिनियम सेक्शन १३(१३) नुसार, तुमहात आमच्या संमतीशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यप्रकारेण घटित संदर्भित सुरक्षेच्या हस्तांतरणास प्रतिबंधित करण्यात आले आहे.

टायगर होम फायनान्स प्रा. लिमिटेडा
स्वाक्षरी.- / प्राधिकृत अधिकारी
दिनांक : १९.०८.२०२६
ठिकाण : महाराष्ट्र
भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

सांकेतिक ताबा सूचना
ICICI Home Finance
नोंदणीकृत कार्यालय : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई-४०००५१.
कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, जे.बी. नगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पू), मुंबई-४०००५९.
शाखा कार्यालय : सिटी सर्व्हे नं. ९१७८/१ / १०२ इंडिया गॅरेज, साऊथ वेस्टर्न कॉर्नर, इंडिया प्लाझा कॉम्प्लेक्सचा पहिला मजला, मिल्ला पेठ, स्वातंत्र्य चौक, सदाशव-२८०००१.

ज्याअर्थी

"आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड"चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत, उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची सरफेस कन्फायनान्स मालकाची नमूद केलेल्या ऋणकोने याच्याकडे याच्याकडे सूचना निर्गमित केल्या आहेत.

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने, ऋणको आणि आम नगरेस याद्वारा सूचना देण्यात आली आहे की, निम्नस्वाक्षरीकारांनी याखालील नमूद केलेल्या तारखांदिवशी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्यातला / निता प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णितेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषकरून ऋणको आणि आम नगरेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेसी कोणताही व्यवहार करू नये. मालमत्तेसबत केलेला कोणताही व्यवहार "आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड"च्या आकारणच्या विषयाधीन असणार आहे.

पूर्वोक्त मर्यादेच्या उपलब्ध वेळेत विमोचनकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधीत आहोत.

अनु क्र.	ऋणको / सह-ऋणकोचे नाव / लोन अकाउंट नंबर	मालमत्तेचे वर्णन / ताब्याची तारीख	मागणी सूचनेची तारीख / मागणी सूचनेमधील रक्कम (रु.)	शक्रोचे नाव
१.	आकाश अशोक महाजन (ऋणको), लक्ष्मी आकाश महाजन (सह-ऋणको), राहुल अशोक महाजन (सह-ऋणको), १०० खोल्या शेतपूरा चोपडा, ता. चोटीची चोपडा, पो. चोपडा उप विभाग, वसवे नाडा, चोपडा, चोपडा, चोपडा - ४२५१०७, महाराष्ट्र. LHJLN00001672502.	हाऊस नं. ०८, प्लॉट नं. ०५, गट नं. ८६०/२, मोजमापाचे ६०.३५ चौ.मी., इंद्रिया तांई नगर, वसवे रोड वसवे, चोपडा शिवार, ता. चोपडा - ४२५१०७, महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे सिमित : उत्तरेच्या दिशेने : ६ मी. रोडद्वारा, दक्षिणेच्या दिशेने : प्लॉट नं. ०६ ता ०७ द्वारा, पूर्वेच्या दिशेने : रो हाऊस नं. ०७ द्वारा, पश्चिमेच्या दिशेने : रो हाऊस नं. ०९ द्वारा / ताब्याची तारीख : १३-ऑगस्ट-२०२६.	१८.०५.२०२६ रु. २३,२९,२७२/-	जळगाव
२	आकाश अशोक महाजन (ऋणको), लक्ष्मी आकाश महाजन (सह-ऋणको), राहुल अशोक महाजन (सह-ऋणको), १०० खोल्या शेतपूरा चोपडा, ता. चोटीची चोपडा, पो. चोपडा उप विभाग, वसवे नाडा, चोपडा, चोपडा, चोपडा - ४२५१०७, महाराष्ट्र. LHJLN00001672542.	हाऊस नं. ०८, प्लॉट नं. ०५, गट नं. ८६०/२, मोजमापाचे ६०.३५ चौ.मी., इंद्रिया तांई नगर, वसवे रोड वसवे, चोपडा शिवार, ता. चोपडा - ४२५१०७, महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे सिमित : उत्तरेच्या दिशेने : ६ मी. रोडद्वारा, दक्षिणेच्या दिशेने : प्लॉट नं. ०६ ता ०७ द्वारा, पूर्वेच्या दिशेने : रो हाऊस नं. ०७ द्वारा, पश्चिमेच्या दिशेने : रो हाऊस नं. ०९ द्वारा / ताब्याची तारीख : १३-ऑगस्ट-२०२६.	१८.०५.२०२६ रु. ३२,७४७/-	जळगाव

वर नमूद केलेले ऋणको / हमीदारांना याद्वारा रकमेच्या परतफेडीकरिता ३० दिवसीय सूचना निर्गमित केली आहे, अन्यथा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ चा रुल्स ८ व ९ अंतर्गत तरतुदींच्या अनुसार, गहाण ठेवलेल्या मालमत्तेची या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या समाप्तीनंतर विक्री करण्यात येईल.

दिनांक : १९ ऑगस्ट, २०२६ स्थळ : चोपडा
प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
CFM Thoughtful Regeneration
कॉर्पोरेट कार्यालय : १ला मजला, वेकफिल्ड हाऊस, स्प्रॉट रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०००३८

ताबा सूचना
(स्थावर मालमत्तेसाठी) **नियम ८ (१) सहवाचता**
परिशिष्ट ४

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांचे अधिकृत अधिकारी असलेले यांनी (सीएफएमएआरसी ट्रस्ट - २१३ म्हणून या क्षमतेत कार्यरत) सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४, २००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ३ सहवाचता निर्देशित कलम १३(१२), १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी केली ज्यात सदर निर्देशित सूचना मिळवल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेत नमूद केलेली रक्कम परत करण्याचे आवाहन केले होते. प